पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०५/०३/२०२०**

गडचिरोली पोलीस दलाकडुन ८ गुन्हयातील जप्त गांजा (अंमली पदार्थ ) नाश

स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली

दिनांक ०३.०३.२०२० रोजी मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे अध्यक्षेखाली गठीत करण्यात आलेल्या अंमली पदार्थ नाश समीतीने गडचिरोली घटका अंतर्गत येणाऱ्या विविध पोलीस स्टेशन मधील अंमली पदार्था संदर्भात दाखल असलेल्या ८ गुन्हयातील जप्त मुद्देमाल शासनाने निर्गमीत केलेल्या कारवाई प्रमाणे जाळुन नाश केला.

सदर कारवाई दरम्यान पोस्टे असरअली येथील २ गुन्हे, पोस्टे चामोर्शी येथील २ गुन्हे, उपपोस्टे पेंढरी राजाराम (खांदला) उपपोस्टे पेंढरी, पोस्टे कोरची व पोस्टे गडचिरोली येथील प्रत्येकी १ अशा एकुन ८ गुन्हयातील एकुन ३२.६५५ कि.ग्रॅम गांजा किमंती ३,२०,६५५/- रुपयाचा माल जाळुन नाश करण्यात आला. सदर प्रक्रिया ही कोर्ट विद्यमान श्री. एन.पी. वासाडे, दुसरे न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी गडचिरोली, समीतीचे अध्यक्ष पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे, कमेटी मधील सदस्य श्री. मनीष कलवानिया (भापोसे) अपर पोलीस अधिक्षक, अहेरी, श्री. गोरख गायकवाड, प्र. पोलीस उप अधिक्षक (मुख्या.) गडचिरोली तसेच श्री. उल्हास पी. भुसारी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपुर येथील सहा. रासायनिक विश्लेषक, श्री.म. पु. पेशेट्टीवार, वजन मापे विभागाचे प्रतिनीधी रुपचंद निबाजी फुलझेले निरीक्षक, जिल्हा परिषद गडचिरोली येथील पंच श्री. प्रभु रायसिडाम,श्री. जिवनलाल सयाम, यांचे उपस्थितीत करण्यात आले.

# <u>वार्तापत्र</u>

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली 	दिनांक ०५.०३.२०२०

| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| देसाईगंज अप.<br>क्र.६३/२०२०कलम<br>६५(अ),८३,९८ क महा.<br>दारुबंदि अधि.<br>. | मौजा गांधीवार्डदेसाईगंज१<br>किमी पश्चिमपो.स्टे<br>देसाईगंज<br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक ०५.०३.२०२० चे<br>१३.०० ते १३.३० वा.पर्यत | सरकार तर्फे :- सफौ/७८७ दादाजी करकाडे नेम.<br>स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या.<br>गडचिरोली<br>**आरोपीतांचे नाव :-**<br>**१. योगेश विट्ठल माकडे वय २५ वर्षे,रा.ब्रम्हपुरीता. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर**<br>**पाहिजे आरोपी १. घनश्याम गराडेरा. देसाईगंज** |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हयातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील सिमावर्ती राज्यातील तसेच जिल्हयातील देशी/विदेशी दारु विक्री दुकाणातुन मोठया प्रमाणात दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने आडमार्गाने बेकादेशिर वाहतुक करुन स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असल्याने स्थानिक चिल्लर दारु विक्रेते हे अवैध विक्री करीत असतात अशा प्रकारे होत असलेल्या अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

आगामी होळी व रंगपंचमी सनाचे पर्वावर गडचिरोली जिल्हयात मोठया प्रमाणात अवैध दारु विक्रि होण्याची शक्यता असल्यानेसदर कालावधीत अवैध दारु विक्रीस आळा बसुन होळी, रंगपंचमी सनाचे दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक हे अशा अवैध दारु विक्रीवर तसेच बेकायदेशिर वाहतुकीवर लक्ष ठेवुन होते. दिनांक ०५.०३.२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेस मिळालेल्या माहितीचे आधारे मौजा देसाईगंज परिसरात पोहचुन अवैध दारु रेड गस्तीकामी गांधीवार्ड देसाईगंज येथे सापळा रचुन पाळत ठेवुन असतांना दुपारी १२.००वाजताचे दरम्यान एक मारोती सुझुकी रिट्झ कंपनीचे चारचाकी वाहन क्रमांक एमएच ०१ बिएफ ००२६ तसेच नमुद वाहनाचे समोर काही अंतरावर ॲक्टीवा अशी वाहने संशयास्पद रित्या आढळुन आल्याने सदरचे चारचाकी तसेच दुचाकी वाहनास थांबविले असता, ॲक्टीवा दुचाकीने दारुचे बॉक्स लोड असलेल्या वाहनाची पायलटिंग करीत असलेला इसम त्याचे ताब्यातील दुचाकी घटनास्थळी सोडुन पळुन गेला. चारचाकी वाहनात दारुचे बॉक्स लोड करुन बेकायदेशिर वाहतुक करीत असलेला नमुद क्रमांकाचे वाहनाचालकास ताब्यात घेवुन त्याचे कडे चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव योगेश विठ्ठल माकडे वय २५ वर्षे, रा. ब्रम्हपुरी ता. ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपुर असे सांगीतले असुन, सोबतचा सहकारी नामे श्रावण अशोक आत्राम यांचे माध्यमाने मौजा अर्जुनी (मोर.)येथील दारु विक्री दुकाणातुन दारुचे बॉक्स खरेदी करुन सोबतचा ॲक्टीवा दुचाकी चालक घनश्याम गराडे यास दारु लोड असलेल्या चारचाकी वाहनासमोर पायलटिंग करण्यास सांगुन दारुचा माल देसाईगंज येथील चिल्लर दारु विक्रेत्यांना पुरवठा करण्या करीता घेवुन आल्याने सांगीतले. नमुद क्रमांकाचे चारचाकी वाहनात देशी दारु सुपर सॉनीक रॉकेट संत्रा कपंनीचे एकुन १३ सिलंबद बॉक्स प्रति बॉक्स १०० प्रमाणे एकुन १३०० सिलबंद निपा एकुन १,०४०००/- रुपये किमंतीचा मुद्देमालासह दारुचे बेकायदेशिर वाहतुककरीता तसेच पायलटिंग करीता वापरण्यात आलेली चारचाकी व दुचाकी वाहने असा एकुन ५,५४,०००/- रुपये किमंतीचा मुदेमाल जप्त करण्यात आला असुन वरील प्रमाणे नमुद अटक व पाहिजे आरोपीता विरुध्द पोस्टे देसाईगंज येथे कायदेशिर कारवाई करण्यात आली.

# <u>वार्तापत्र</u>

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली

दिनांक ०५.०३.२०२०

**स्थानिक गुन्हे शाखेकडील विशेष पथकाने अटक केले ३५ वर्षा फरार असलेले आरोपी**

जिल्हयातील २० ते ४० वर्षापासुन आरोपी मिळुन येत नसल्या कारणास्तव न्यायालयात प्रकरणे प्रलंबित असल्याने त्यांच्या निर्गती मध्ये अडचनी येत असल्याबाबत मा. न्यायालयाने पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे कळविले. त्या अनुषंगाने श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी प्रकरणाचे गांभीर्य बघुन तात्काळ स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांचे माध्यमातुन पोउपनि नारायण बच्चलवार, यांचे अधिनस्त विशेष पथकाची निर्मीती करुन त्यांना प्रलंबित असलेल्या एकुन ९५ सुप्त नस्ती प्रकरणातील आरोपीतांचे निरंतर वॉरंट ( *Standing Warrant*) तामीली बाबत आदेशीत केले. त्या अनुषंगाने विशेष पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेवुन तसेच स्वत:ची ओळख लपवुन इतर विभागातील असल्याचे भासवुन वॉरंट वर नमुद असलेल्या पत्यांवर तेथील स्थानिक लोकांना विश्वासात घेवुन आरोपीतांबाबत माहिती संकलीत करुन आज मागील ३५ वर्षापासुन स्वत:ची ओळख लपवुन व स्वत:चे खरे नाव बदलवुन मौजा गुंजेवाही ता. सिदेवाही जिल्हा चंद्रपुर येथे वास्तव्य करीत असल्याचे माहिती वरुन पोलीस पथक नमुद आरोपीचा सदर ठिकाणी येथे शोध घेवुन त्या ठिकाणी सापळा रचुन नमुद आरोपीची खात्री केली असता, वॉरंट मधील नमुद प्रमाणे त्याचे नाव रमेश तुकाराम सुरपाम रा. पोटेगाव ता.जिल्हा गडचिरोली असे असल्याची खात्री झाल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले. अशा प्रकारे पोलीस विभागास व न्याय विभागाची गुंगारा देणाऱ्या आरोपीस मौजा गुंजेवाही ता. सिदेवाही जिल्हा चंद्रपुर येथुन ताब्यात घेवुन मा. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय देसाईगंज यांचे समक्ष हजर करण्यात आले.

वरील तिन्ही कारवाई मा. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक, तसेच डॉ मोहित कुमार गर्ग अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेली आहे.